# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ / श्रावण १२, १९४५ ( शके )**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) उप मुख्यमंत्री**
**(३) आदिवासी विकास मंत्री**
**(४) गृहनिर्माण मंत्री**
**(५) बंदरे मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १६**

---

### पिंपळदरी (ता.औढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील सिंचन तलावाच्या सांडव्याला मोठे तडे गेल्याबाबत

**(१) * ७०७७४ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळदरी (ता.औढा नागनाथ,जि.हिंगोली) येथे पूर्णा पाटबंधारे विभागाच्या वतीने सन १९७२ मध्ये दोन अब्ज लिटर साठवण क्षमता असलेल्या सिंचन तलाव बांधला सदर सिंचन तलाव जामगव्हाण, करंजारा, चिंचोर्डी, नांदापूर, पिंपळदरी व टेभूरदरा या भागातील शेतकऱ्यांसाठी महत्वाचा असून त्यामुळे परिसरातील ६०० हेक्टर शेती सिंचनाखाली येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तलावाच्या सांडव्यासह आजूबाजूच्या भिंतीना मोठे तडे गेले असून भिंतीचे दगड निखळत असल्याने पावसाळयात तलाव भरल्यानंतर ४ गावांना मोठा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सिंचन तलावाची दुरुस्ती करण्याची मागणी शेतकऱ्यांनी वारंवार संबंधित विभागाकडे करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर सिंचन तलावाची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी कोणती कार्यवाही केली तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

पिंपळदरी ल.पा.तलावाच्या दगडी बांधकाम असलेल्या सांडव्याचे दगड निखळलेले आहेत. तथापि, आजुबाजुच्या भिंतींना तडे गेलेले नाहीत. तुर्त धोका उद्‌भवत नसुन सदर सांडव्यासह आजुबाजुच्या भिंतींची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

(३) स्थानिक लोप्रतिनिधींनी दि.०१/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये पिंपळदरी, लपा तलावाच्या दुरूस्तीची मागणी केली असून त्याकरिता एकूण रु.५.०० कोटी निधीची मागणी केलेली आहे. पिंपळदरी लपा तलावाच्या सांडव्याच्या दुरूस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील सुमुख हिल्स इमारतीचे झालेले अनधिकृत बांधकाम

**(२) * ६८६१३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत योगसिद्धि डेव्हलपर्स कंपनीच्या विकासकांनी शासकीय भूखंडावर अतिक्रमण व पर्यावरण नियमांचे उल्लंघन करुन सुमुख हिल्स या इमारतीचे अनधिकृत बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी अनिवार्य असलेले महामार्गाचे ना-हरकत प्रमाणपत्र न घेता सार्वजनिक बांधकाम विभागाचे बनावट ना-हरकत प्रमाणपत्र सादर करुन माहे फेब्रुवारी, २००१ मध्ये सदर इमारतीचे बांधकाम अनधिकृतरित्या करण्यात आल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित विकासक व दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) हे, खरे नाही.

सदर ठिकाणच्या महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूर असून या योजनेमध्ये संयुक्त इमारत (पुनर्वसन विंग A,B आणि विक्री विंग C,D,E आणि F) चा समावेश आहे. सदर इमारतीस दि.०७.१२.२०२२ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे. या योजनेसाठी पर्यावरण विभागाकडून दि.२९.०४.२०१४ अन्वये परवानगी प्राप्त झालेली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर योजनेसाठी कार्यकारी अभियंता (Road Development Division) यांनी दि.१५.०२.२००१ अन्वये ना-हरकत प्रमाणपत्र जारी केलेले आहे. सदर ना-हरकत प्रमाणपत्राबाबत Road Development Division यांच्याकडून दि.२६.१०.२०२१ च्या पत्रान्वये अभिप्राय मागविण्यात आले होते. त्यास कार्यकारी अभियंता, रस्ते विकास विभाग क्र.४ सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी, मुंबई यांनी दि.२९.११.२०२१ च्या पत्रान्वये कळविले आहे की, दि.१५.०२.२००१ रोजी या विभागाकडून देण्यात आलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राबाबतची कार्यवाही ही मुंबई महामार्ग अधिनियम, १९५५ अन्वये करण्यात आलेली आहे, अशी या कार्यालयाची धारणा आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### धुंदलवाडी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील वेदांत मेडिकल कॉलेजच्या प्राचार्याने विद्यार्थीनीचा केलेला विनयभंग

**(३) * ६९८१० श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुंदलवाडी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील वेदांत मेडिकल कॉलेजच्या प्राचार्याने विद्यार्थीनीचा विनयभंग केल्याप्रकरणी कासा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कॉलेजच्या प्राचार्याने यापूर्वी अशाच पध्दतीने तरूणीची फोनवरुन आणि प्रत्यक्ष छेड काढल्या प्रकरणी संबधित विद्यार्थीनीने महाविद्यालयाच्या प्रशासनाकडे लेखी तक्रार करुनही त्यांचेवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी एका शिक्षकाविरुद्ध कासा पोलीस ठाणे येथे गु. र. नं. ९४/२०२३,भादविस कलम ३५४ प्रमाणे दिनांक २५ मे, २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) नाही, हे खरे नाही.

सदर बाबत विद्यार्थ्यांकडून किंवा कर्मचाऱ्यांकडून संस्था प्रशासनाकडे आरोपी शिक्षकाविरुद्ध कोणत्याही प्रकारची तक्रार आलेली नसल्याचे कॉलेज प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.
(३) सदर गुन्ह्याच्या तपासावरून तसेच प्राप्त पुराव्यावरून आरोपीत याने गुन्हा केल्याचा कोणताही सबळ पुरावा मिळून आलेला नाही. सदर गुन्ह्याची खोटी फिर्याद अशी ब समरी अहवाल तयार करण्यात आला असुन उप विभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग, पालघर यांच्या मंजुरी करीता पाठविण्यात आला आहे. गुन्ह्यातील आरोपीत यास फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४१(अ)(१) अन्वये नोटीस देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**'स्वराज स्टोन्स एलएलपी' या कंपनीविरोधात कारवाई करण्याबाबत**

**(४) * ६५०९२ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल व उरण भागातील दगडखाणींवर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी दगडखाण व्यवसायिकांना धमकावून, त्यांच्यावर दबाव आणणाऱ्या 'स्वराज स्टोन्स एलएलपी' या कंपनीविरोधात दिनांक १ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास पनवेल शहर पोलिस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुन्हे दाखल केलेल्या 'स्वराज स्टोन्स एलएलपी'या कंपनीच्या मालकांना अटक करण्यात आली असून याबाबत तपासाची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, पनवेल व उरण भागात स्थानिक दगडखाण व्यवसायिकांना भयमुक्त व्यवसाय करण्यासंदर्भात कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, दहशत निर्माण करणे, व्यवसायिकांना व्यवसाय करण्यात अडथळा निर्माण करणे, जीवे मारण्याची धमकी देणे तसेच जबदरदस्तीने करार करणे, अशाप्रकारचे गंभीर संघटित गुन्हे करणाऱ्या 'स्वराज स्टोन्स एलएलपी' या कंपनीच्या चालकांना तडीपार करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हो, हे खरे आहे.

स्वराज स्टोन क्रशर सोबत करार करण्यास भाग पाडून आणि करार न केल्यास जबर दुखापत करण्याची व जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी स्वराज स्टोन एलएलपी संबंधीत आठ जणांविरुद्ध मे. खुशल एंटरप्रायजेसचे मालक यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दिनांक ०३/०५/२०२३ रोजी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २९२/२०२३, भादंवि कलम ३८७, ३२७, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.
(२) सदर गुन्ह्यातील आरोपींना मा. सत्र न्यायालय, पनवेल यांचेकडून अटकपूर्व जामीन मंजूर झाला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(३) पनवेल व उरण भागातील स्थानिक दगडखाण व्यावसायिकांना भयमुक्तपणे व्यवसाय करण्याकरिता पनवेल व उरण भागातील दगडखाण व्यवसायिकांना स्वराज स्टोन एलएलपी किंवा इतर कोणत्याही व्यवसायिकांकडुन धमकावणे किंवा दबाव आणणे असे प्रकार घडल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा नियंत्रण कक्ष, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय यांचेशी संपर्क करण्याबाबत आवाहन करण्यात आले असून प्राप्त तक्रारीवर तात्काळ कारवाई करण्यात येते.

(४) आरोपीविरुद्ध यापूर्वी संबंधीत पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल नसल्याने तडीपार करण्याबाबत कारवाई करण्यात आली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील जिल्हा उप निबंधक यांना लाच घेताना अटक केल्याबाबत

**(५)** * **६४७६२ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये संचालक पदी निवडून आल्यानंतर त्यांच्या निवडी विरोधात दाखल झालेल्या प्रकरणात सुनावणी घेऊन तक्रारदार यांच्या बाजूने निर्णय देण्यासाठी ३० लाख रुपयांची लाच स्वीकारताना जिल्हा उपनिबंधक श्री.सतीश खरे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या नाशिक युनिटने त्यांच्या घरात रंगेहात पकडल्याचे दिनांक १५ मे २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास , उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने श्री.खरे यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) १) सदर प्रकरणी, तक्रारदार हे नाशिक जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये संचालकपदी निवडून आल्यानंतर त्यांच्या निवडीविरूध्द विरोधी गटाने जिल्हा निवडणूक अधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समिती तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नाशिक यांच्या कार्यालयात सदर निवड रद्द होण्यासाठी अपील दाखल केले होते. या अपील प्रकरणात सुनावणी घेऊन तक्रारदार यांच्या बाजूने निर्णय देण्यासाठी आरोपी लोकसेवक, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी स्वत:करिता रुपये ३० लक्ष इतक्या रकमेच्या लाचेची मागणी केल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पडताळणीअंती निष्पन्न झाले. लाचपुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांना त्यांच्या राहत्या निवासस्थानी ३० लक्ष रुपयांची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आल्याने त्यांच्याविरूध्द दिनांक १६.०५.२०२३ रोजी गंगापूर पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे गु.र.नं.१२३/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (सुधारणा २०१८) च्या कलम ७, ७अ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सद्यस्थितीत आरोपी लोकसेवक हे न्यायालयीन कोठडीत असून सदर गुन्ह्याचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांच्यामार्फत सुरु आहे.
२) सदर प्रकरणी संबंधित आरोपी लोकसेवक, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांना सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक १७.०५.२०२३ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.
३) आरोपी लोकसेवक यांची महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महापारेषण कंपनीने हिंजवडी (जि.पुणे) येथे बांधलेले ४०० केव्हीचे सबस्टेशन बंद असल्याबाबत

**(६)** * **६७४२२ श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती आश्विनी जगताप (चिचवंड), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महापारेषण कंपनीने हिंजवडी (जि.पुणे) येथे ८९ कोटी रुपये खर्च करून बांधलेले ४०० केव्हीचे सबस्टेशन गेल्या वर्षापासून बंद असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंजवडी सबस्टेशनसह राज्याच्या विविध भागांत अनेक सबस्टेशन मोठ्या कालावधीसाठी बंद असल्याने राज्याचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच वाहिनी आणि अतिउच्चदाब मनोऱ्याच्या कामासाठी जेजुरी ते हिंजवडी परिसरातील बाधित झालेल्या शेतकऱ्यांना भूसंपादनाची भरपाई तुटपुंजी दिली असल्याने मोबदल्याचे सुधारित धोरण जाहिर करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

४०० के.व्ही. हिंजवडी उपकेंद्र दिनांक ३०.०५.२०१६ रोजी कार्यान्वित (बॅक चार्ज) झाले असून सध्यस्थितीत २२० के.व्ही. स्तरावरुन कार्यरत आहे.
(२) हे खरे नाही.

उपकेंद्रे बंद नसून ४०० के.व्ही. हिंजवडीसह आणखी सहा अति उच्चदाब उपकेंद्रे बॅक चार्ज करण्यात आली आहेत. या पैकी बहुतांश उपकेंद्रे त्यांच्या संलग्न वाहिन्या वन विभागाच्या मंजुरी अभावी कार्यान्वित होऊ न शकल्याने कार्यरत झालेली नाहीत.
(३), (४) होय, हे खरे आहे.

ऊर्जा विभाग शासन निर्णय दिनांक २.११.२०२२ अन्वये ६६ के.व्ही. त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या मनोऱ्याने व्याप्त जागेचा तसेच अति उच्च दाब पारेषण वाहिन्याच्या पट्टयाखालील जमिनीचा नुकसान भरपाईपोटी मोबदला देण्यासंदर्भात निश्चित केले आहे. सदर सुधारित धोरणानुसार बाधित शेतकरी / जमिन धारकांना वाढीव मोबदला देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खुतमापूर (ता.देगलूर, जि.नांदेड) येथे विदयुत तारेला चिकटून शेतकऱ्याचा झालेला मृत्यु

**(७)** * **६६३६० श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खुतमापूर (ता.देगलूर, जि.नांदेड) येथे लोंबकळणाऱ्या विदयुत तारेला चिकटून ५० वर्षीय शेतकऱ्याचा दिनांक ४ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास दुर्देवी मृत्यु झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील शेतकऱ्याचा मृत्यू महावितरणाच्या गलथान कारभारामुळे झाल्याने या प्रकरणी सखोल चौकशीची मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,हे खरे आहे.

दिनांक ०३.०५.२०२३ रोजी वादळी वारे व पावसामुळे ३३/११ केव्ही खुतमापूर, ता. देगलूर उपकेंद्रातून पुरवठा होत असलेल्या ११ के.व्ही. बिजलवाडी वाहिनीवरील गंगाबाई गोपाल बडगे यांच्या शेतामधील लोखंडी कटपॉइंटवर झाडाच्या फांद्या तुटून पडल्याने लोखंडी खांब वाकल्यामुळे खांबावरील विद्युत तारांचे जमिनीपासूनचे अंतर कमी झाले. दिनांक ०४.०५.२०२३ रोजी सूरज गोविंद बडगे हे शेतामधून जात असताना त्यांचा संपर्क वाकलेल्या लोखंडी खांबावरील विद्युत तारेसोबत झाल्याने त्यांना प्राणांतिक विद्युत अपघात घडला.
(२) सदर अपघात प्रकरणी विद्युत निरीक्षक, नांदेड यांनी घटनास्थळाची पाहणी करुन, अपघात प्रकरणी महावितरण कंपनी जबाबदार असल्याचा अहवाल दिला आहे.
(३) मयत शेतकऱ्याच्या कुटुंबियांना प्राथमिक आर्थिक मदत रुपये २०,०००/- दिनांक ०६.०५.२०२३ रोजी अदा करण्यात आली आहे. वारसाहक्क प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे उर्वरित नुकसान भरपाई प्रलंबित आहे .

सदर अपघातास मौजे खुतमापूर येथे कार्यरत असलेले वरिष्ठ तंत्रज्ञ हे जबाबदार असल्याने त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**मंत्रालयात सचिव असल्याचे सांगून लिपिक तसेच चालकपदी नोकरी लावण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याबाबत**

**(८) * ६६०११ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंत्रालयात सचिव असल्याचे सांगून लिपिक तसेच चालक पदी नोकरी लावण्याचे आमिष दाखवून एका तरुणीसह तीन जणांची १६ लाख रुपयांना फसवणूक केल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात दादर (मुंबई) पोलिस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मंत्रालयात सचिव असल्याचे सांगून लिपिक तसेच चालक पदी नोकरी लावण्याचे आमिष दाखवून एका तरुणीसह तीन जणांची रुपये १६,१३,५००/- एवढ्या रक्कमेची फसवणूक केल्याच्या फिर्यादीवरुन दिनांक १४/०४/२०२३ रोजी दादर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. १३३/२०२३ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणातील आरोपींना अटक करण्यात आली असुन तपास पूर्ण करून दोषारोपपत्र मा. न्यायालयात सादर केले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मालाड (मुंबई) येथील आप्पापाडा झोपडपट्टीला लागलेली आग**

**(९) * ७०१४८ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संजय जगताप (पुरंदर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (मुंबई) येथील आप्पापाडा झोपडपट्टीला भीषण आग लागून २००० हून अधिक झोपड्या जळून खाक झाल्या असल्याचे दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आगीत ५ नागरिकांचा मृत्यु झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार झोपडीधारकांना व मृत्यु झालेल्या नागरिकांना आर्थिक मदत करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील तुळशी परिमंडळामधील मौजे मालाड येथील राखीव वन सर्व्हे क्रमांक २३९/१ पैकी मधील अतिक्रमीत क्षेत्रातील आंबेडकर नगर, आप्पापाडा येथे दिनांक १३.०३.२०२३ रोजी सायंकाळी सुमारे ५.१७ वाजताचे दरम्यान १०४१ झोपड्यांना आग लागल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामध्ये श्री. हूसेनआप्पा मल्लपा अन्नासारम यांचा मृत्यु झाला आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी एकूण १०४१ झोपडी धारकांपैकी १०३० झोपडी धारकांना आर्थिक मदत तहसीलदार, बोरीवली यांचेमार्फत देण्यात आली आहे. उर्वरित ११ प्रकरणामध्ये वारस चौकशी इत्यादीबाबत खातरजमा करुन आर्थिक मदत देण्याची कार्यवाही तहसीलदार, बोरीवली यांच्या मार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेत नोकरी देण्याचे आमिष दाखवून केलेली फसवणूक

**(१०)** * **६५८११ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेत १२ लाख रुपयांत कायमस्वरुपी नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून अनेकांची फसवणूक झाल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेत या प्रकारचे रॅकेट कार्यरत असून एका शल्य कक्ष सहाय्यकाकडून २१ लाख रुपये घेवून बनावट नोकरीचे आदेश दिल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सर जे. जे मार्ग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
बृहन्मुंबई महानगरपालिकेत नोकरी लावून देतो असे आमिष दाखवून आरोपी याने फिर्यादी व त्यांच्या कुटूंबीयांचा विश्वास संपादन करून त्यांच्या मुलांना व जावयाला, बनावट नोकरीचे आदेश देऊन एकूण रुपये २१ लक्ष एवढया रक्कमेची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) होय.
सदर प्रकरणी सर जे. जे. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे दि.१९/०४/२०२३ रोजी गु.र.क्र. १५१/२०२३, भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान भा.दं.वि. कलम ४६७, १२० (ब), २०१, ३४ ची वाढ करण्यात आली आहे.
(४) सदर प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे भुवनेश्वर (ता. रोहा, जि.रायगड) येथे मे. फोर पिलर्स बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स या कंपनीने केलेली फसवणूक

**(११)** * **६५१८२ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भुवनेश्वर (ता. रोहा, जि.रायगड) येथे मे. फोर पिलर्स बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स या कंपनीने प्रत्येकी १२ सदनिका असलेल्या ३ मजल्यांच्या एकूण १७ इमारतींचा प्रकल्प राबवला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित विकासकाने ग्राहकांकडून आगावू रक्कम घेऊन प्रदीर्घ कालावधी होऊनही सदनिकांचा ताबा न दिल्यामुळे अनेक सदनिकाधारकांनी सदर कंपनी व विकासका विरोधात वेगवेगळया ठिकाणी तक्रारी नोंदवल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदनिकाधारक श्री.देवेंद्र लक्ष्मण बनकर, रा.घाटकोपर, मुंबई यांनी सदनिकेचा ताबा न मिळाल्याने दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी एमआयडीसी पोलीस ठाणे, अंधेरी (पूर्व), मुंबई यांचेकडे संबंधित विकासकाविरूध्द फसवणूकीची लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) होय. सदनिकेचा विहीत मुदतीमध्ये ताबा न दिल्याने सदनिकाधारक श्री. मनिष दाभोळकर यांनी मे. फोर पिलर्स बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, रोहा चे विकासक व भागिदार यांच्या विरोधात दि. २६/११/२०१९ रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार रोहा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१०६/२०१९ भा.दं.वि. कलम ४२०, ३४ सह महाराष्ट्र मालकी हक्कांचा सदनिका अधिनियम १९६३ चे कलम ३,४,५,१३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

अन्य सदनिकाधारक श्री.देवेंद्र लक्ष्मण बनकर, रा. असल्फा व्हीलेज पाईपलाईन, घाटकोपर (प.), मुंबई यांनी दि.२९.१०.२०२२ रोजी एमआयडीसी पोलीस ठाणे, अंधेरी येथे फोर पिलर्स बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्सचे विकासक यांच्याविरुध्द फसवणूक केल्याबाबत तक्रार अर्ज दाखल केला होता. तथापि, सदरचा तक्रार अर्ज रोहा पोलीस ठाणे, रायगड यांच्याकडे पुढील चौकशीसाठी पाठविण्यात आला आहे. तसेच श्री. बनकर यांनी सदर विकासकाविरुध्द दि.२४.०५.२०२३ रोजी रोहा पोलीस ठाणे यांचेकडे तक्रार अर्ज दिला आहे.

(४) रोहा पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.नं. १०६/२०१९ या गुन्ह्यातील निष्पन्न चार आरोपींपैकी तीन आरोपी फरार असून उर्वरीत एका आरोपीस जामीन मंजूर केला आहे. आरोपी विकासक व भागिदार यांच्या विरोधात मा. न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा येथे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

तसेच तक्रारदार श्री.देवेंद्र बनकर यांच्या दि.२४.०५.२०२३ रोजीच्या तक्रार अर्जावर रोहा पोलीस ठाणे मार्फत चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंडोर (जि.पालघर) येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालयात इंग्रजी माध्यमाची शाळा बंद करण्याचा घेतलेला निर्णय

**(१२) * ६४६५१ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंडोर (जि.पालघर) येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील इंग्रजी माध्यमाची शाळा सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून बंद करण्याचा निर्णय आदिवासी विकास प्रकल्पाने घेतला असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इंग्रजी माध्यामाची शाळा सुरु करताना कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता मौखिक आदेशाने शाळा सुरु करण्यात आल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर इंग्रजी शाळेमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शासकीय आश्रमशाळा नंडोर, ता. जि. पालघर येथे इंग्रजी माध्यमाची इयत्ता १ ली चा वर्ग सुरु करण्यात आलेला आहे. त्यामध्ये १२ विद्यार्थी प्रवेशीत झाले होते. मात्र पुढील २ वर्ष कोविड-१९ मध्ये

शासनाच्या निर्देशान्वये शाळा बंद असल्याने सन २०२०-२१ मध्ये फक्त ८ विद्यार्थी व इयत्ता ४ थी च्या वर्गात १२ विद्यार्थी असे एकूण २० विद्यार्थी प्रवेशीत होते. सदरचे विद्यार्थी उत्तीर्ण होऊन सन २०२३-२४ मध्ये पुढील वर्गात शिक्षण घेत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सेलू (जि.परभणी) तालुक्यातील कुपटा शिवारात निम्न दुधना प्रकल्पाच्या डाव्या कालव्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१३)** * **६६८२२ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेलू (जि.परभणी) तालुक्यातील कुपटा शिवारात निम्न दुधना प्रकल्पाच्या सुरु असलेल्या डाव्या कालव्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी संबंधित विभागाच्या कार्यकारी अभियंता यांच्याकडे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामासाठी माती मिश्रित वाळूचा वापर करण्यात येत असून त्याकडे संबंधित अभियंत्याचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे, खरे नाही .
निम्न दुधना प्रकल्पाशी संबंधित नमूद आशयाची शेतकऱ्यांची तक्रार संबंधीत विभागीय कार्यालयात प्राप्त झालेली नाही.
तथापि, सेलु ता.सेलु जि.परभणी, निम्न दुधना प्रकल्पाच्या डाव्या कालव्याच्या चाऱ्याचे काम अत्यंत निकृष्ट होत असल्याबाबत, मा.श्री. सुरेश रामराव जाधव, संसद सदस्य, परभणी, यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांना उद्देशून लिहलेल्या पत्रात तक्रार केली आहे.
(२) हे खरे नाही.
निम्न दुधना प्रकल्पाची कामे ही केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने (PMKSY) अंतर्गत समाविष्ट आहेत.
सदरील कामांवर त्रयस्थ यंत्रणा गुण नियंत्रण विभागामार्फत वेळोवेळी तपासणी केली जाते. तसेच गुण नियंत्रण विभागाचे सर्व चाचणी निष्कर्ष समाधानकारक आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आदिवासी विकास महामंडळाच्या (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) खरेदी केंद्रावर मका खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१४)** * **७०४५८ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चामोर्शी (जि.गडचिरोली) तालुक्यातील आदिवासी विकास महामंडळाच्या खरेदी केंद्रावर मका पिकाचे उत्पादन घेतलेले नसताना देखील शेतकऱ्यांची मका उत्पादक शेतकरी म्हणून नोंदणी केली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मका घेतल्याची खोटी नोंद करुन व्यापारी व अधिकारी यांच्या संगनमताने मका खरेदीमध्ये प्रचंड प्रमाणात गैरव्यवहार करीत असल्याबाबत शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या शेतकऱ्यांनी आपल्या शेतामध्ये मका उत्पादन घेतलेले आहे, त्यांना खरेदी केंद्रावर मका विकण्यास अडचणी निर्माण होत असून त्यांना आपला मका न विकताच परत न्यावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मका उत्पादन शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत तसेच संबंधित व्यापारी व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांकडून भरडधान्य मका ऑनलाईन नोंदणी करूनच ७ /१२ व पिकपेरा पाहूनच आदिवासी विकास महामंडळाकडून खरेदी करण्यात आलेला आहे.सदर मका खरेदीबाबत शेतकऱ्यांकडून कोणतीही तक्रार आदिवासी विकास महामंडळाकडे प्राप्त झालेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बचत गटांतील महिलांचे 'मायक्रो फायनान्स'च्या लघु वित्तीय कंपन्यांच्या माध्यमातून आर्थिक नुकसान होत असल्याबाबत

**(१५) * ६५५९१ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.निलेश लंके (पारनेर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य आर्थिक पाहणी अहवाल २०२२-२३ नुसार माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत राज्यात १ लाख ५९ हजार ४११ महिला बचत गट सक्रीय असून बचत गटांची एकूण सदस्य संख्या २०.१५ लाख एवढी असून माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत या बचत गटांनी विविध वित्तीय संस्थांकडून ६,६४० कोटी रुपये एवढे कर्ज घेतले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास , महिला बचत गटांच्या सदस्यांनी लघु वित्तीय कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणात कर्ज घेतले असून या कर्जाचे वार्षिक व्याजदर जवळपास २५ % आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, व्याजदर जास्त असल्याने बचतगटातील महिलांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे ,हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लघु वित्तीय कंपन्यांच्या या लुटमारीला रोखण्यासाठी व त्यांचे नियंत्रण करण्यासाठी राज्य शासनाची एकही यंत्रणा अस्तित्वात नसल्याने उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लघु वित्तीय कंपन्यांच्या माध्यमातून यंत्रणा उभारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) होय.
तथापि, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२२-२३ मधील बचत गटाबाबतची सदर आकडेवारी ही संपूर्ण महाराष्ट्रातील नसून, महिला व बाल विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत (माविम) स्थापित बचत गटांची आहे.
(२) महिला आर्थिक विकास महामंडळाकडून बचत गटांना केवळ राष्ट्रीयकृत बँकांव्दारे कर्ज मिळवून दिले जाते. मायक्रो फायनान्स संस्थांकडून कर्ज मिळवून देण्यात येत नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) वन विभागाच्या मांडवी वन परिक्षेत्रात कार्यरत असलेल्या वनपाल यांनी लाच घेतल्याबाबत

**(१६) * ६४८४० श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) वन विभागाच्या मांडवी वन परिक्षेत्रात कार्यरत असलेल्या वनपाल श्री.रजाक मन्सुरी आणि त्याचा साथीदार यांनी तक्रारदाराकडे वन जमिनीवर वाढीव बांधकाम केल्याप्रकरणी कारवाई न करण्यासाठी अडीच लाख रूपयांची लाच घेताना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक १७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास रंगेहाथ पकडल्याचे निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन महिन्यातील मांडवी कार्यालयात लाच घेतानाची दुसरी घटना असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) I. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, आरोपी लोकसेवक वनपाल, मांडवी, जिल्हा-पालघर (वर्ग-३) यांनी तक्रारदार यांच्या सर्व्हे नं.११३ मधील जमीनीवर केलेल्या शेडच्या बांधकामावर कारवाई न करण्यासाठी खाजगी इसमामार्फत रु.५,००,०००/- इतक्या रकमेच्या लाचेची मागणी केल्याचे पडताळणीअंती लाचलुचपत प्रतिबंधक विभागास निष्पन्न झाले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक यांच्याकरिता मागणी केलेल्या लाचेचा पहिला हफ्ता रु.२,५०,०००/- इतकी रक्कम स्विकारतांना आरोपी खाजगी इसमास रंगेहाथ पकडण्यात आले. त्यानंतर आरोपी खाजगी इसम व आलोसे वनपाल यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७अ व १२ प्रमाणे मांडवी पोलीस ठाणे येथे दिनांक १८/०५/२०२३ रोजी गु.नों.क्र.१३८/२०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्यात आरोपींना त्याच दिवशी अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांच्यामार्फत सुरू आहे.
II. या प्रकरणी, आरोपी लोकसेवक यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व (अपील) नियम, १९७९ चे नियम ४(२) (अ) मधील तरतुदीनुसार पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच दिनांक १८.०५.२०२३ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आलेले असून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
III. तसेच आरोपी लोकसेवक यांच्या मालमत्तेची उघड चौकशी करण्याची कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांच्याकडून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.